# मुंबई विद्यापीठ

क्र. मासविक/आयसीडी/२०२१–२२/११

## परिपत्रक

(Break the chain)

संदर्भः— १.Government of Maharashtra Public Health Department, G.T. Hospital Complex Building, 10th floor Mantralaya, Mumbai-400 001, No. Corona 2021/C.R. 366/Arogya-5, dated 02 August 2021

२. विद्यापीठ परिपत्रक क्र. मासविक/आयसीडी/२०२१–२२/५, दिनांक १८ जून २०२१

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखण सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील कर्मचा–यांची उपस्थिती दिनांक २१ जून २०२१ पासून पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत विभागातील कर्मचारी संख्येच्या ५०% प्रमाणे राहील. त्याचप्रमाणे सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागाचे उपस्थिती विवरणपत्र कुलसचिवांना सादर करावे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत कार्यालयीन आवश्यकतेनुसार कर्मचा–यांस कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य असेल असे कळविण्यात आले होते.

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांना कळविण्यात येते की, विद्यापीठात नॅकची तयारी, परीक्षा निकालाबाबतची कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याकरिता तसेच प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया (पदवी व पदव्युत्तर) वेळेत पार पाडण्याकरिता प्रशासनाच्या स्तरावर असा निर्णय घेण्यात आला आहे की, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी हे दिनांक ११ ऑगस्ट २०२१ पासून कार्यालयीन वेळेत कार्यालयात १००% उपस्थित राहतील. त्याचप्रमाणे सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागाचे उपस्थिती विवरणपत्र कुलसचिवांना सादर करावे.

...२/-

New circular



सदर बाब सर्व संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचा—यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

मुंबई— ४०० ०३२
१० ऑगस्ट २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र/संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

२. स्वीय सहायक: १) कुलगुरू २) प्र. कुलगुरू ३) प्रभारी कुलसचिव ४) प्रभारी वित्त व लेखा अधिकारी ५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रषित:—

१. सचिव, उमासा

२. सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन

३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ

४. सरचिटणीस, एज्युकेशनल एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन